# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
# महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

नवी मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१
दूरध्वनी क्रमांकः- 020-26122846/47 e mail comm.urban@gmail.com

---

जा.क्र.ना.बँका/१-सआ/वेबसाईट/ना.बँका/माहिती/२०२१/143
दिनांक :- 22/०३/२०२१

प्रति,

कार्यासन अधिकारी,
माहिती व तंत्रज्ञान शाखा
मुख्यालय, पुणे

**विषय :- सहकार आयुक्त कार्यालयाच्या वेबसाईटवर नागरी बँका कार्यासनाची माहिती अपलोड करणेबाबत..**

वरील विषयाकडे कृपया आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणी आपणास विनंती करण्यात येते की, नागरी बँका कार्यासनाची सोबत जोडलेप्रमाणे माहिती सहकार आयुक्त कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात यावी.

( आनंद कटके )
उपनिबंधक (नागरी बँका)
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

Kindly upload
22/3/21

Tr No 143 22/3/2021

# 15.16. Urban Bank

### 14.16.1. Branch Description

The Urban Bank Branch carries out all its operations related to the Urban Cooperative Banks. It has its organization structure till the Taluka Level. All the information is gathered in specified formats.

### 14.16.2. Functions of the Branch

a) Amendments of Bye-Laws wherein the Bank sends the proposal for amendment, the registrar scrutinizes the same and has to reply to the bank within 2 months

b) Acts upon the Building/Land Purchase proposal received from Bank

c) Expels the member/members of the Board of Directors of the Bank on receipt of complaints against them after appropriate scrutiny.

d) Holds inquiry under Section 83 of the MCS Act for concerns like Fraud, Serious Irregularities in the Bank. Accordingly the appointment of Inquiry Officer is done. After Inquiry, the Officer submits the report to the Registrar who then scrutinizes the same and takes appropriate action.

e) Further, appropriate action is taken u/s 88 of the MCS Act where Responsibility of losses is fixed upon the Board of Directors of the Bank.

f) Also issues Certificate to the Bank to recover losses incurred by the bank from the Directors responsible for the loss of the bank under Section 98 of the MCS Act .

g) As per requisition from RBI, Liquidation of the Bank is carried out under Section 110 (A) (2) and Section 102.

h) As per requisition from RBI, BoD of the bank is superseded and administrator is appointed under Section 110 (A) (3)

i) For the recovery of urban Cooperative banks officers of the bank were given powers under section 156 of the MCS Act and section 107 of the MCS Rules.

j) Master Data of individual UCBs is maintained in particular format.

## 15.16. नागरी बँका

### 14.16.1. शाखेबाबत माहिती

नागरी बँका कार्यासनामध्ये नागरी सहकारी बँकांचे बाबतीत सर्व प्रकारचे कामकाज चालते. याबाबत तालुका स्तरापर्यंत संघटनात्मक रचना आहे. नागरी बँकांबाबतची माहिती ही विहीत नमुन्यामध्ये संकलित करण्यात येते.

### 14.16.2. नागरी बँक शाखेची कामे

अ) बँकांचे पोटनियमामध्ये दुरुस्तीचा प्रस्ताव बँक मंजूरीसाठी निबंधकांकडे पाठविते. निबंधक सदर प्रस्तावाची छाननी करतात आणि दोन महिन्यात बँकेस उत्तर / मंजूरीबाबत आदेश देतात.

ब) बँकेकडून प्राप्त झालेल्या जागा खरेदी / इमारत बांधकाम प्रस्तावावर कार्यवाही करणे.

क) संस्थेच्या संचालक किंवा सभासदांविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यानंतर योग्य छाननीनंतर संस्थेच्या संचालक किंवा सभासदांना पदावरुन दूर करणे.

ड) नागरी सहकारी बँकांमध्ये अपहार, गैरव्यवहार, गंभीर अनियमीतता याबाबतीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 अन्वये चौकशी करण्यात येते.

इ) तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 88 नुसार बँकेच्या संचालक मंडळावर बँकेस झालेल्या नुकसानीची जबाबदारी संबंधीत व्यक्तींवर निश्चित करण्यात येते.

फ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 98 अन्वये बँकेस झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित झालेल्या अपचारी व्यक्तींकडून वसुली करण्यासाठी प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते.

ग) रिझर्व्ह बँकेकडून मागणीपत्र प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 110 (अे) (2) व कलम 102 अन्वये बँक अवसायनात घेणे.

ह) रिझर्व्ह बँकेकडून मागणीपत्र प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 110 (अे) (3) अन्वये बँकेचे संचालक मंडळ निष्प्रभावित करणे व बँकेवर प्रशासक नियुक्ती करणे.

ई) नागरी सहकारी बँकांच्या वसुलीसाठी बँकेच्या अधिका-यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 156 व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 चे नियम 107 अन्वये वसुलीचे अधिकार प्रदान करण्यात येतात.

ज) नागरी सहकारी बँकांची माहिती ही विहीत नमुन्यामध्ये संकलित केली आहे.